सायबर पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड
पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड,
प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे

| | | |
|---|---|---|
| प्रेसनोट | पिंपरी चिंचवड | दिनांक – १३/१२/२०२४ |

# शेअर मार्केट ट्रेडिंगमध्ये गुंतवणुकीचे बहाण्याने ऑनलाईन ७१,०५,०००/- रुपयांची आयटी मध्ये काम करणारे इसमाची फसवणुक करणारे रशियन आरोपीस सायबर पोलीस ठाणेकडुन गोवा येथुन ताब्यात घेवुन गुन्हा उघड

वाकड येथे राहणारे इसमास इन्स्टाग्रामवर रिल्स पाहत असताना शेअर मार्केट संदर्भात आलेल्या जाहीरातीवर क्लिक केले असता आरोपी यांनी त्यांना व्हॉटसअप ग्रुप L-2 Franklin Templeton Stock pull group चे अॅडमिन चेतन सेगल +919068095935, +917093972923, मिरा दत्त +918869085568 तसेच +918923521079, +919766344225, +919766344390, +919952055998 तसेच FT (India) Customer Care VIP 66, FTAM Customer service - +919042217089, +919596740961 यांनी यावरुन संपर्क करुन Website – fsknbf.com लिंक पाठवुन त्यांचे फेक वेबसाईटवरुन शेअर मार्केटचे स्टॉक आणि आयपीओ ट्रेडींग करण्यास सांगुन बँक अकाऊंटवर **एकुण ७१,०५,०००/- रुपये** भरण्यास सांगुन फसवणुक केली म्हणुन सायबर पोलीस ठाणे येथे गुरनं. ०७/२०२४ बी.एन.एस. कलम ३१८(४),३१९(२) सह माहिति तत्रंज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६डी, प्रमाणे गुन्हा दाखल असुन सायबर पोलीस ठाणे मार्फत तपास चालु आहे.

दाखल गुन्हयाचा तपास करीत असताना आरोपी यांनी गुन्हयातील फसवणुकीची रक्कम वेगवेगळया बँक अकाऊंटवर घेतली असल्याने त्या अनुषंगाने तपास करीत असताना कॉसमॉस बँक अकाऊंट नं. १३५१००१०७८१ मध्ये दि.२६/११/२०२४ रोजी २८ लाख रुपये आरोपी यांनी घेतले असल्याने त्याअनुषंगाने पोउनि. पोमण, पोउनि. कातकडे यांची पथकांनी तपास करता परकिय नागरीक टोनी व मार्क या नावाचे आरोपींनी सदर अकाऊंट गोवा येथे चालविले असल्याबाबत तांत्रिक व इतर माहीती प्राप्त झाली त्यावरुन तात्काळ वरिष्ठांचे परवानगीने मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री. संदिप डोईफोडे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. विशाल हिरे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. रविकिरण नाळे यांना तपासाबाबत सुचना दिल्या.

त्याप्रमाणे सपोनि. प्रविण स्वामी व पथकास गोवा येथे पाठविले असता त्यांनी गोवा येथे स्थानिक पोलीसांचे मदतीने कौशल्यपुर्वक तपास करुन मधलमज, मन्ड्रेम पेरनम, गोवा येथुन परकिय रशियन नागरीक - Tony @ Anatoliy Mironov S/O Alexandrovich Mironov वय ३० वर्षे रा. 32, Leninskay, Orenburg City, Russia Passport No. 766146572 सध्या रा. घर नं. १३५ हनुमान मंदीराजवळ, मधलमज, मन्ड्रेम पेरनम, गोवा यास ताब्यात घेतले. सुरुवातीला त्याने उडवा उडवीची व असमाधानकारक उत्तरे देत असल्याने त्यास गोवा येथुन सायबर पोलीस ठाणे येथे आणुन त्याचेकडे कौशल्यपुर्वक तपास करता त्याने सदरचा गुन्हा त्याचा मार्क नावाचा साथीदार तसेच इसम नामे श्रेयश संजय माने वय-२२ वर्ष, रा. मुळ सागर कॉलनी शास्रीनगर, कोथरुड, पुणे यांचेसह करीत असल्याची कबुली दिली आहे.

त्यांचा गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्याने Tony @ Anatoliy Mironov S/O Alexandrovich Mironov व श्रेयश संजय माने यांना दाखल गुन्हयात अटक करुन त्यांची गुन्हयाचे तपासकामी मा. न्यायालयात हजर करुन दि. १५/१२/२०२४ रोजीपर्यंत पोलीस कोठडी मंजुर करण्यात आली आहे. प्राथमिक तपासामध्ये आरोपी नामे श्रेयश माने हा त्याचे मित्रांकडुन गेमींगच्या नावाने अकाऊंट व त्यांचे लिंक मोबाईल नंबर घेवुन विमानाने गोवा येथे जावुन सदर रशियन आरोपी यांना पुरवुन त्यांचेसोबत सदरचे गुन्हे करीत होता. दाखल गुन्हयाचा पोलीस निरीक्षक श्री. रविकिरण नाळे करीत आहे.

**तपासामध्ये अटक रशियन आरोपी हा मलेशिया मध्ये गेल्याबाबत तसेच त्याने गुन्हयातील अकाऊंट मलेशिया या देशात चालविले असल्याची माहीती मिळुन आली आहे. तसेच त्याचा गुजरात पोलीस त्यांचेकडील दाखल असलेले दोन गुन्हयामध्ये मागील दोन महीन्यापासुन शोध घेत असल्याची माहीती मिळाली आहे.**

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड - श्री.विनयकुमार चौबे, मा. सह पोलीस आयुक्त- श्री. डॉ. शशिकांत महावरकर, मा. अपर पोलीस आयुक्त- श्री. वसंत परदेशी, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे - श्री. संदिप डोईफोडे, मा. सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे १ - श्री. डॉ. विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाणेचे पोनि. रविकिरण नाळे, सपोनि. प्रविण स्वामी, पोउपनि सागर पोमण, प्रकाश कातकाडे, पोलीस अंमलदार हेमंत खरात, दिपक भोसले, अतुल लोखंडे, श्रीकांत कबुले, सौरभ घाटे, दिपक माने, परशुराम चव्हाण, सुरज जाधव, सुरंजन चव्हाण, अनिकेत टेमगिरे, महेश मोटकर, सचिन घाडगे, निलेश देशमुख, दिपाली चव्हाण, मोनिका चित्तेवार, स्मिता पाटील, दिपाली टोपे सर्व नेमणुक सायबर पोलीस ठाणे यांच्या पथकाने केली आहे.

**(संदिप डोईफोडे)**
पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, पिंपरी चिंचवड.

- **शेअर मार्केट ट्रेडिंगमध्ये गुंतवणुकीचे बहाण्याने ऑनलाईन ७१,०५,०००/- रुपयांची आयटी मध्ये काम करणारे इसमाची फसवणुक करणारे रशियन आरोपीस पिंपरी चिंचवड सायबर पोलीसांकडुन गोवा येथुन ताब्यात घेवुन गुन्हा उघड**

- वाकड येथे राहणारे इसमास इन्स्टाग्रामवर रिल्स पाहत असताना शेअर मार्केट संदर्भात आलेल्या जाहीरातीवर क्लिक केले असता आरोपी यांनी त्यांना वेगवेगळया व्हॉट्सअप ग्रुपमध्ये अॅड करुन शेअर मार्केटमध्ये चांगला रिटर्न मिळवुन देतो अमीष दाखवुन त्यांना लिंकद्वारे त्यांचे फेक वेबसाईटवरुन शेअर मार्केटचे स्टॉक आणि आयपीओ ट्रेडींग करण्यास सांगुन बँक अकाऊंटवर एकुण ७१,०५,०००/- रुपये भरण्यास सांगुन फसवणुक केली.

- त्याबाबत तक्रारदार यांची सायबर पोलीस ठाणे येथे गुरनं. ०७/२०२४ बी.एन.एस. कलम ३१८(४),३१९(२) सह माहिती तत्रंज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६डी, प्रमाणे गुन्हा दाखल असुन सायबर पोलीस ठाणे मार्फत तपास चालु आहे.

- गुन्हयातील फसवणुकीची रक्कम २८ लाख रुपये दि.२६/११/२०२४ रोजी कॉसमॉस बँक अकाऊंट नं. १३५१००१०७८१ मध्ये जमा झाली असल्याने त्याबाबत सदर अकाऊंटधारकाचा शोध घेवुन तपास केला असता त्याने सदर अकाऊंट त्याचे मित्राने मागितलेवरुन गेमिंगकरीता दिले असल्याची माहीती मिळाली.

- त्यानंतर अधिक तपास व तांत्रिक तपास करता सदरचे अकाऊंट हे गोवा येथे वापरले गेले असल्याची माहीती मिळाली व आरोपीने सदर अकाऊंटचे किट व लिंक मोबाईल गोवा येथे परकिय इसमास दिले असल्याबाबत माहीती मिळाली.

- सदर माहीतीचे आधारे तात्काळ सायबर सेल कडील सपोनि. प्रविण स्वामी यांचे पथक गोवा येथे पाठविणेत आले.

- सपोनि. प्रविण स्वामी व पथकाने गोवा येथे तांत्रिक व कौशल्यपुर्वक तपास गोवा येथुन रशियन इसम **Tony @ Anatoliy Mironov S/O Alexandrovich Mironov Age- 30 Yrs. R/A- Leninskay, Orenburg City, Russia Passport No. 766146572** यास ताब्यात घेतले.

- आरोपी नामे श्रेयश माने हा त्याचे मित्रांकडुन गेमींगच्या नावाने अकाऊंट व त्यांचे लिंक मोबाईल नंबर घेवुन विमानाने गोवा येथे जावुन सदर रशियन आरोपी यांना पुरवुन त्यांचेसोबत सदरचे गुन्हे करीत होता.

- गुन्हयासाठी वापरलेले बँक अकाऊंटमधुन परदेशात दुबई इत्यादी ठिकाणी रक्कम वर्ग केल्याचे दिसुन आले आहे.

- सदर आरोपी सुरुवातीला मोबाईलचे पासवर्ड किंवा इतर कोणतीही माहीती देत नव्हता त्यामुळे त्यास ताब्यात घेवुन सायबर पोलीस ठाणे येथे आणुन त्याचेकडे अधिक कौशल्यपुर्वक तपास करता त्याने सदरचा गुन्हा त्याचा परकिय साथीदार मार्क याचेसह पुण्यातील इसम श्रेयश संजय माने वय-२२ वर्ष , व्यवयाय- शिक्षण रा. मुळ सागर कॉलनी शास्त्रीनगर, कोथरुड, पुणे याचेकडुन अकाऊंट प्राप्त करुन गुन्हा करीत असल्याची कबुली दिली आहे. सदर गुन्हयात आंतरराष्ट्रीय टोळीचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे.

- त्यावरुन नमुद रशियन आरोपी **Tony @ Anatoliy Mironov** व त्याचा नमुद पुण्यातील साथीदार श्रेयश माने यांना दाखल गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

- तपासामध्ये अटक रशियन आरोपी हा मलेशिया मध्ये गेल्याबाबत तसेच त्याने गुन्हयातील अकाऊंट मलेशिया या देशात चालविले असल्याची माहीती मिळुन आली आहे. तसेच त्याचा गुजरात पोलीस त्यांचेकडील दाखल असलेले दोन गुन्हयामध्ये मागील दोन महीन्यापासुन शोध घेत असल्याची माहीती मिळाली आहे.

- आरोपी याचे मोबाईलमध्ये इतर बरेच बँक अकाऊंट मिळुन आले असुन त्याबाबत, त्याचे साथीदार मार्क, आंतरराष्ट्रीय रॅकेटचा तपास, फसवणुकीची रक्कम पुढे कोठे वर्ग करीत आहे त्याबाबतचा तपास, त्यांचे क्रिप्टो आयडीची माहीती घेणेकामी त्यांना न्यायालयात हजर करुन त्यांची दि. १५/१२/२०२४ पर्यंत पोलीस कोठडी रिमांड घेण्यात आली आहे. गुन्हयाचा तपास सायबर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक श्री. रविकिरण नाळे हे करीत आहेत.